# प्रकरण - तिसरे

## रिक्षा ड्रायव्हरांचे (चालकांचे) आर्थिक जीवनमान

अ) उत्पन्न ( जमा )

ब) खर्च

क) बचत

ड) कर्ज

## रिक्षा ड्रायव्हरांचे (चालकांचे)आर्थिक जीवनमान :

कोल्हापूर शहरातील रिक्षा ड्रायव्हरांच्या (चालकांच्या) आर्थिक स्थितीचा, जीवनमानाचा विचार करता प्रामुख्याने चार प्रकारात ( विभागात ) विचार करावा लागतो. ते प्रकार (विभाग) सर्वसाधारणपणे असे - (अ) उत्पन्न किंवा जमा, (ब) खर्च, (क) बचत (शिल्लक) आणि (ड) कर्ज.

(अ) जमा किंवा उत्पन्न ( Income )

रिक्षा ड्रायव्हरांच्या उत्पन्नाचा प्रमुख मार्ग म्हणजे रिक्षा व्यवसाय हाच आहे. ह्या बाबतीत विचार करता पेट्रोल आणि इतर किरकोळ खर्च वजा जाता प्रत्येक रिक्षा ड्रायव्हरला सर्वसाधारणपणे दर दिवशी ५० ते ६० रुपये निव्वळ उत्पन्न मिळते म्हणजेच प्रत्येक रिक्षा ड्रायव्हरचे दरमहा सरासरी उत्पन्न हे १५०० रुपये ते १८०० रुपये आहे.

अर्थात रिक्षा ड्रायव्हरांच्या ह्या उत्पन्नाचा विचार करताना आणखी काही गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे. कारण काही रिक्षा ड्रायव्हर हे दुस-याच्या मालकीच्या रिक्षावर फक्त ड्रायव्हर म्हणून काम करतात. म्हणजेच त्यांची स्वत:ची रिक्षा असत नाही. अशा ड्रायव्हर लोकांना रिक्षा मालकांना काही रक्कम द्यावी लागते. त्या प्रकारानुसार मालकाकडून रिक्षा घेताना ड्रायव्हरने पेट्रोलची पातळी (Petrol level ) पाहून म्हणजेच गाडीत पेट्रोल किती आहे हे पाहून धंद्यासाठी रिक्षा बाहेर

न्यायची व मालकाना रिक्षा परत करताना तेवढेच पेट्रोल भरुन आणखी २५ ते ३० रुपये रोख देऊन गाडी द्यायची असा हा प्रकार आहे. ह्या प्रकारानुसार ड्रायव्हर लोकांना ब-याच वेळा कमी उत्पन्न मिळत असते कारण धंदा व्यवस्थित झाला तर उत्पन्न जादा व नाही झाला तर दिवसात केवळ २० ते २५ रुपयेच त्याना शिल्लक राहतात म्हणजेच अशा ड्रायव्हर लोकांचे उत्पन्न दरमहा १००० रुपये पर्यंतच सरासरीने जात असते.

याशिवाय एकत्र कुटुंब पध्दतीत असणारे नि कॉलेज करुन रिक्षा व्यवसाय करणारे जे तरुण आहेत तेही दर दिवशी सरासरी ३५ ते ४० रू. या व्यवसायातून मिळवितात म्हणजेच त्यांचे मासिक उत्पन्न हे सरासरी १००० रुपये ते १२०० रुपये पर्यंत असते. हे सर्व उत्पन्न पेट्रोल व इतर खर्च वजा जाता सरासरीने होत असते.

ब) खर्च ( Expenditure )

रिक्षा ड्रायव्हरांना दरमहा जे सरासरी उत्पन्न मिळत आहे त्यातूनच त्यांना आपला व आपल्या कुटुंबियांचा दरमहा खर्च भागवावा लागतो. या खर्चामध्ये अन्नधान्य, चहा, साखर, दुध, गॅस, रॉकेल, घरभाडे, साबण, शाम्पू, शिकेकाई, पान, तंबाखू, उपहारगृह, सिनेमा, नाटक व औषधपाणी आणि इतर सर्व खर्चाचा समावेश होतो. प्रत्येक रिक्षा ड्रायव्हरला आपल्या उत्पन्नाचा आवाका लक्षात घेऊन ह्या सर्व बाबींवर खर्च करावा लागतो. याशिवाय धार्मिक, सामाजिक व काही अचानक उद्‌भवणा-या गरजांवरही

रिक्षा ड्रायव्हरांना खर्च करावा लागतो, म्हणजेच ह्या सर्व बाबी रिक्षा ड्रायव्हरच्या खर्चाच्या बाबी आहेत. तसेच असेही चित्र दिसते की, जे युवक शिक्षण पूर्ण करीत करीत हा व्यवसाय करतात किंवा जे युवक एकत्रित कुटुंबात राहून हा व्यवसाय करतात ते रिक्षा ड्रायव्हर आपल्या स्वत:च्या खर्चासाठी काही नाममात्र पैसे ( रुपये ) शिल्लक ठेवतात नि बाकीचे सर्व उत्पन्न आपल्या कुटुंब प्रमुखाकडे देतात. अशा रिक्षा ड्रायव्हरांचा खर्च हा त्या एकत्रित कुटुंबाच्या खर्चातूनच होत असतो.

क) <u>बचत</u> ( Saving )

रिक्षा ड्रायव्हरांच्या एकूण उत्पन्नाचा आणि खर्चाचा विचार करता असे आढळते की त्यांच्याकडून बचत होणे शक्यच नाही. आपण बचत करता काय ? या प्रश्नावर शेकडा ९५ टक्के लोकांनी नकारात्मक उत्तरे दिली. यातील काहींचे म्हणणे असे की एकूण उत्पन्न आणि एकूण खर्च यातून बचतीकडे पाहतासुध्दा येत नाही तर काहींच्या सांगण्यानुसार एकत्र-कुटुंब पध्दत असल्याने ते आपला उत्पन्नाचा सर्व भाग कुटुंब प्रमुखाकडेच देत असतात. परिणामी व्यक्तिश: त्यांना बचतीची गरज वाटत नाही. काही रिक्षा ड्रायव्हर मात्र बचत ( Saving ) करीत असल्याचे आढळून आले. वृध्दापकाळाची तरतूद, मुलांच्या पुढील शिक्षणाची तरतूद, मुलीच्या विवाहासाठी, घरबांधकामासाठी, काही वस्तूंच्या खरेदीसाठी आणि तातडीच्या गरजांच्या पूर्तीसाठी ह्या लोकांच्याकडून बचत केली जात असल्याचे

आढळले. विशेषत म्हणजे भिशी, सहकारी पतसंस्था आणि नागरी सहकारी बँकात बचत करण्याची प्रवृत्ती आढळली. काही ड्रायव्हर हे दररोज, काही साप्ताहिक तर काही मासिक अशा पध्दतीने बचत करीत असल्याचे आढळले. प्रसंगानुरुप बचत करणारे काही ड्रायव्हरही आहेत.

ड) कर्ज ( Loan )

" प्रमाणाबाहेरचा खर्च हीच कर्जाची जननी आहे (असते)."
या सुत्रानुसार कोल्हापूरातील रिक्षा ड्रायव्हरांच्या कर्जाविषयी विचार केला तर असे आढळले की, एकूण उत्पन्न आणि एकूण खर्च ह्यातून होणारी घावपळ नि अचानक उद्भवणारे काही खर्च ह्या सर्वांना तोंड देताना कर्जाचा आधार घेतल्याशिवाय रिक्षा ड्रायव्हर आपली वाटचाल करु शकत नाही. कर्जाचा उद्देश, कर्ज कोणत्या संस्थेकडून घेतले, त्याचा वापर सुयोग्य झाला काय, परतफेड कशी आदी प्रश्नांच्या उत्तरातून असे दिसून आले की बहुतांशी रिक्षा ड्रायव्हरनी रिक्षा खरेदीसाठी कर्ज काढलेले आहे. यामध्ये विशेषत: सुशिक्षित अशा पदवीधर तरुणांचा अधिक समावेश आहे. ह्याशिवाय घरबांधणी नि इतर घरगुती वस्तूंच्या खरेदीसाठी रिक्षा ड्रायव्हरनी कर्ज घेतलेले आहे. अर्थात अशा स्वरुपांचे कर्ज हे प्रामुख्याने सहकारी बँका आणि नागरी सहकारी पतसंस्था यांच्याकडूनच घेतलेले दिसून येते, तसेच भिशी सारख्या संस्थाकडूनही कर्ज घेतल्याचे आढळले. ह्या सर्व कर्जाचा विचार करता राष्ट्रीयकृत बँकांच्याकडून कर्ज घेणाऱ्या रिक्षा ड्रायव्हरांची संख्या खूपच कमी आहे.

सहकारी बँकांचे कर्ज घेण्यासाठी आम्हास अधिक सोईचे व योग्य आहे असे अनेक रिक्षा ड्रायव्हरकडून सांगण्यात आले.

रिक्षा ड्रायव्हरकडून घेतलेले कर्ज नियमित हप्त्यानुसार परतफेड होत असल्याचेही अनेकांच्या सांगण्यावरुन दिसून आले. शिवाय महत्वाचे म्हणजे ज्या कारणासाठी कर्ज घेतले गेले आहे नेमके त्याच कारणासाठी कर्जाचा वापर केला आहे हेही अनेकांच्या सांगण्यावरुन दिसून आले.

तक्ता क्र. एक

कोल्हापुरातील रिक्षा ड्रायव्हरांचे (चालकांचे) उत्पन्न.

| | उत्पन्नाचे प्रमाण | रिक्षा ड्रायव्हरांचे प्रमाण(शेकडा) |
|---|---|---|
| १) | पुरेसे उत्पन्न (पर्याप्त) | ५४ टक्के |
| २) | अपुरे उत्पन्न | ४६ टक्के |
| | | १०० टक्के |

हा तक्ता पुढील गोष्टी स्पष्ट करतो.

१) १०० पैकी ५४ रिक्षा ड्रायव्हरांना सर्वसाधारण जीवनमान जगण्यापुरते उत्पन्न मिळते तर ४६ टक्के रिक्षा ड्रायव्हरांचे उत्पन्न सर्वसाधारण राहणीमानास अपुरे पडणारे आहे.

२) ५० टक्केहून अधिक लोकांना सर्वसाधारण जीवन जगण्यास रिक्षा व्यवसाय साहाय्यभूत ठरलेला आहे.

..